Vol II Issue XII Jan 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.12,Jan. 2013
ISSN:-2230-7850
Available online at www.isrj.net
ORIGINAL ARTICLE

# महादेव कोळी या जमातीचा शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास भौगोलिक सर्वेक्षण – कुडे बु।। ता.खेड, जि.पुणे

डी.एम.मारकड

हुतात्मा राजगुरू महाविदयालय,
राजगुरूनगर.

*सारांश*

पश्चिम महाराश्ट्रातील एक सुधारीत जमात म्हणून महादेव कोळी या आदिवासी जमातीचा उल्लेख केला जातो. या शोधनिबंधात महादेव कोळी या आदिवासी जमातीच्या आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. महादेव कोळी ही आदिम जमात जरी सहयाद्रीच्या कुशीत राहत असली तरी आधुनिकतेचे थोडेफार वारे या जमातीस स्पर्श करीत आहे. तरीही बहुसंख्य समाज हा मागास आहे. त्याच्याच स्थितीगतीचा अभ्यास येथे मांडलेला आहे.

## प्रस्तावना

आदिवासी जमातींचा सध्याच्या काळात अनेक अंगांनी अभ्यास होत आहे. आदिवासी हे लोक जंगल व डोंगराळ प्रदेश येथेच मुख्यत्वे वास्तव्य करत असल्याने त्यांना कोणी जंगलचे राजे तर कोणी धरतीची लेकरे असे म्हणतात. [1] आदिवासींना प्राचीन किंवा मूळचे रहिवासी (मूलनिवासी) असेही म्हटले जाते. डॉ.घुर्ये यांनी मागासलेले हिंदू असे म्हटले आहे.

आदिवासींची व्याख्या करताना अनेकांनी वेगवेगळया प्रकारची व्याख्या केली आहे. [2]

1) गिलीन यांच्या मते, – ''एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.''
2) डब्ल्यू जे पेरी – यांच्या मते, ''समान बोलीभाशा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात. ''

महादेव कोळी ही आदिवासी जमात वायव्य महाराश्ट्रातील एक महत्वाची आदिवासी जमात आहे. महादेव कोळयांना डोंगरकोळी किंवा राजकोळी असेही संबोधले जाते.

बीजसंज्ञा – आदिवासी, लोकसंख्या, वयोगटरचना, साक्षरता, व्यावसायिक रचना.

1981 च्या जनगणेनुसार महाराश्ट्रातील महादेव कोळयांची लोकसंख्या 7,87,448 इतकी होती. [3]

महादेव कोळी ही एक पुढारलेली जमात आहे. लोकसंख्येनुसार ही महाराश्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाची आदिवासी जमात आहे. महादेव कोळयांचे पूर्वज पूर्वी शंकराची उपासना करत. त्या वरूनच त्यांचे नाव महादेव कोळी असे पडले असावे. महादेव कोळयांचा प्रमुख व्यवसाय पशूपालन हाच होता. मात्र अलिकडच्या काळात यात बदल होत आहे.

### उद्देश –

1) महादेव कोळी या जमातीच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.
2) या जमातीच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

### अभ्यासक्षेत्र –

या शोधनिबंधामध्ये नमुना सर्वेक्षण करण्यासाठी पुणे जिल्हयातील खेड तालुक्यातील कुडा बु।। हे गाव घेतले आहे. कुडा बु।। हे खेड तालुक्यातील पश्चिम भागात खेडपासून 40 कि.मी अंतरावर आहे. हे ठिकाण पश्चिम पट्टयामध्ये दळणवळणाच्या दृष्टीने मेटावरचे (मोक्याचे) स्थान असून येथून पश्चिमेकडे अंबोली, परसूल, खरपुड या गावांना रस्ते जातात. या गावातून वायव्येकडे घोटवडीस रस्ता जातो तर पूर्वेस औदर मार्गे राजगुरूनगरला रस्ता जातो.

हे स्थान शिंगी या डोंगराच्या पायथ्याशी असून शिंगी पर्वतरांगेच्या उत्तरेस आहे. शिंगी हे खेड तालुक्यातील सर्वोच्च शिखर असून त्याची उंची 1293 मीटर इतकी आहे. कुडा बु।। या गावाची समुद्रसपाटीपासून उंची 616 मीटर्स आहे. 4 हे ठिकाण आरळा या भीमानदीच्या

उपनदीच्या खोऱ्यात आहे.

या ठिकाणी मोसमी हवामान असून सरासरी वार्शिक पर्जन्य 400 से.मी. पर्यंत आहे.



*अभ्यास पद्धती –*

या शोधनिबंधासाठी 25 प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली होती. ती प्रश्नावली अभ्यास क्षेत्रातील यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या 25 आदिवासींच्या घरातील लोकांकडून भरून घेतली. तसेच आधारासाठी भारताच्या जनगणनेच्या आकडेवारीचा उपयोग केलेला आहे. अभ्यासासाठी 20 टक्के एवढे सॅम्पलिंग घेतले आहे.

*विषय विवेचन –*

प्रस्तुत निबंधामध्ये कुडे बु।। या गावातील 25 आदिवासी कुटुंबाची प्रत्यक्ष मुलाखत घेवून प्रश्नावल्या तयार केल्या. 2001 नुसार खेड तालुक्याची एकुण लोकसंख्या 2,86,333 असून त्यामध्ये आदिवासींची लोकसंख्या 37,124 इतकी आहे. ही लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या 13 टक्के आहे. कुडे बु।। या गावची एकुण लोकसंख्या (2001) 1258 असून त्यापैकी 605 आदिवासी आहेत. हे आदिवासी 48.1 टक्के आहेत. 605 लोकांपैकी 132 लोकांचे सर्वेक्षण केलेले आहे. हे सर्वेक्षण यादृच्छिक प्रतिचयन पध्दतीने केले असून हे प्रतिचयन 20 टक्के इतके आहे.

*लोकसंख्या वैशिष्टे –*

अभ्यासासाठी यादृच्छिक पध्दतीने 132 लोकसंख्या असणाऱ्या 25 घरांची निवड केली. 132 लोकांपैकी 70 पुरूष असून त्यांचे प्रमाण 53 टक्के आहे. तर स्त्रिया 62 असून त्यांचे प्रमाण 47 टक्के आहे. दरहजारी स्त्रियांचे प्रमाण 886 असून ते फारच कमी आहे.

*वयोगट रचना –*


| अवस्था | शैशव | पूर्व बाल्य | उत्तर बाल्य | पौगंड | कुमार | तरूण | पौढ | वृद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वय | 0 – 2 | 3 – 6 | 7 – 12 | 13 – 14 | 15 – 20 | 20 – 40 | 41 – 60 | 60 – |
| संख्या | 04 | 11 | 13 | 09 | 16 | 42 | 23 | 14 |
| | बाल्यावस्था (अनुत्पादक) 37 (28.03 %) | | | | मध्यवय (उत्पादक) 81 (61.36 %) | | | अनुत्पादक 14(10%) |

वरील सारणीवरून आपल्या लक्षात येते की, 61 टक्के लोकसंख्या ही उत्पादन कार्यात भाग घेवू शकणारी आहे. तर 39 टक्के लोकसंख्या त्यांच्यावर अवलंबून आहे. अवलंबता गुणोत्तर 39 : 61 असे आहे.

*साक्षरता –*

| तपशील | निरक्षर | 4 थी पर्यंत | 7 वी पर्यंत | 10 वी पर्यंत | 12 वी पर्यंत | पदवी |
|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | 19 | 28 | 26 | 24 | 12 | 8 |
| % | 14 % | 21 % | 20 % | 18 % | 9 % | 6 % |

*आलेख*





वरील आलेखावरून असे लक्षात येते की, निरक्षरांची टक्केवारी 19 : असून साक्षर लोकसंख्या 81 : आहे. मात्र तरीही 4 थी व 7 वी पर्यंत शिकलेल्या लोकसंख्येचाच भरणा अधिक असून तो अनुक्रमे 20 व 18 टक्के आहे. म्हणजेच एकूण 38 टक्के आहे. पदवी पर्यंत शिक्षण घेणा–यांची संख्या केवळ 6 टक्के आहे.

*व्यावसायिक रचना –*

महादेव कोळी या जमातीतील बहुसंख्य लोक हे जिराईत शेती व शेतमजूरी या प्राथमिक व्यावसायात गुंतलेले आहे. त्यावरून त्यांच्या आर्थिक स्थितीची कल्पना येईल.

| व्यवसाय | फक्त भोती | भोती व भोतमजूरी | भोती व नोकरी | फक्त नोकरी | भोती व गवंडीकाम | फक्त भोतमजूर |
|---|---|---|---|---|---|---|
| कुटुंबे | 01 | 15 | 5 | 1 | 02 | 01 |
| टक्केवारी | 4 % | 60 % | 20 % | 4 % | 8 % | 4 % |




आदिवासी कुटुंबामध्ये घरातील कोणतरी एक नोकरीस आहे. अशा कुटुंबाची संख्या केवळ 20 टक्के आहे. हया वीस टक्के कुटुंबातील एकही व्यक्ती उच्च पदावर नसून पोष्टमन, प्राथमिक शिक्षक, बॅंक कर्मचारी, पवनचक्की कामगार अशा कमी पगार असणाऱ्या नोकरीत आहेत. विशेष म्हणजे या कुटुंबात कोणीच उच्च अभियांत्रिकी किंवा वैदयकीय, प्रशासकीय सेवा यामध्ये नाहीत.

60 टक्के लोक केवळ शेती व शेतमजूर या व्यवसायात गुंतलेले आहे. त्यांच्याकडे प्रतिकुटुंबाकडे सरासरी केवळ 4 एकर शेती आहे. त्यापैकी 2 एकर तर माळरानच आहे. उरलेल्या 2 एकर शेतीची मशागत पूर्णपणे पारंपारिक पद्धतीने होते. ही शेती हंगामी असून वर्षातून फक्त एकच पीक घेतले जाते. या शेतीस जलसिंचन, आधुनिक खते, बि–बियाणे यांच्या सुविधा अजिबात नाहीत. शेती अत्यंत मागासलेली असून शेतीतून एकरी सरासरी केवळ 5 क्विंटल तांदूळ पिकतो. प्रत्येक शेतकरी सरासरी 10 क्विंटल तांदूळ पिकवितो. सर्वेक्षणात या शेतकऱ्यांकडे एकूण 3 विहीरी असल्याचे निर्दशनास आले आहे. मात्र या विहीरींचा उपयोग फक्त पाणी पिण्यासाठी होतो. शेतीतून तांदळा व्यतिरिक्त ज्वारी, नाचणी, भुईमूग यांचीही पिके घेतली जातात. मात्र त्यांचे उत्पादन नगण्य आहे.

आदिवासींची शेती संपूर्णपणे उदरनिर्वाहक आहे. फक्त शेतीवर दैनंदिन गरजा भागविणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे आदिवासी काही प्रमाणात पशूपालन करतात. आदिवासींच्या पाच कुटुंबामध्ये शेळीपालन होते. 10 कुटुंबाकडे प्रत्येकी एक किंवा दोन गायी आहेत. 11 कुटुंबाकडे शेतीसाठी स्वतःचे बैल आहेत तर 11 कुटुंबाकडे म्हशी आहेत. कुठलाही पशू नसणारी 3 कुटुंबे आहेत.

केवळ शेती व पशूपालन यांवरही गरजा पूर्ण होवू शकत नाहीत. त्यामुळे स्वतःच्या शेतीतील काम संपल्यावर आदिवासी पुरूष व स्त्रिया दुसऱ्याच्या शेतात अथवा बांधकामावर मजूर म्हणून जातात. यांना दिवसाची 100 रूपये मजूरी मिळते. खरे म्हटले तर मजूरीवरच यांचा घर प्रपंच चालतो. मात्र मजूरी ही दररोज मिळत नाही. त्यामुळे आदिवासींना अर्धबेकार रहावे लागते. एकूण 132 लोकांपैकी 67 लोक अर्धबेकार असून त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण 51 टक्के आहे.

आदिवासींना वार्शिक उत्पन्न फक्त प्राथमिक गरजा भागविण्यापुरतेच मिळते. त्यामुळे त्यांच्याकडे इतर साधनांचा जवळजवळ अभाव आहे. सर्वेक्षण केलेल्या 25 कुटुंबांपैकी केवळ 8 टक्के कुटुंबाकडे डिश टि.व्ही आढळून आला. त्यापैकी फक्त चार कुटुंबाकडे डिव्हीडी आढळून आला. 132 लोकांपैकी केवळ 28 लोकांकडे मोबाईल होता. हे प्रमाण केवळ 21.21 टक्के आहे. घरांच्या दृष्टीने विचार केल्यास 15 घरांमध्ये किमान एकतरी मोबाईल आढळून आला.

सर्वेक्षण केलेल्या 25 कुटुंबांपैकी 24 कुटुंबे चुलीवर स्वंयपाक करतात. केवळ एका कुटुंबाकडे गॅस आहे. मात्र 8 कुटुंबे अशी आढळून आली की, त्यांच्याकडे गॅस होता पण तरीही तो भरण्यासाठी पैसा नसल्यामुळे ते चुलीवर स्वयंपाक करतात.

*निवारा –*

आदिवासींची अर्थव्यवस्थाच मागास असल्याने 25 पैकी 16 कुटुंबे जुन्या मातीच्या भिंतींच्या कौलारू घरात राहतात. 8 कुटुंबे सिंमेंटी पत्र्यात राहतात. विशेषः म्हणजे स्लॅब अथवा बंगला यामध्ये राहणारे एकही कुटुंब आढळले नाही.

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी 3 कुटुंबाकडे बैलगाडी, 3 कुटुंबाकडे सायकली, 6 कुटुंबाकडे मोटार सायकली तर 13 कुटुंबाकडे कोणतेही वाहन नसलेले आढळून आले.

आदिवासींच्या आर्थिक स्थितीविशयी डॉ.गुरूनाथ नाडगौडे म्हणतात4 " आदिम अर्थ – व्यवस्थेचे निर्वाह प्रधानता हे मुख्य लक्षण आहे. मानवाच्या मुलभूत गरजा अस्तित्व टिकविण्यासाठी पुऱ्या करणे अगदी जरूरीचे असते. एवढया मर्यादित गरजाही पुऱ्या करण्यासाठी आदिमांना अक्षरशः झगडावे लागते. तेव्हा त्यांच्या आर्थिक कियेचे उद्‌दिष्ट निर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा पुऱ्या करणे हे असते. यालाच निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था असे म्हणतात.

*निष्कर्ष –*

1)आदिवासींमध्ये कार्यप्रवण गटात 61 टक्के लोकसंख्या आढळते.
2) आदिवासींमध्ये 86 टक्के साक्षरता असून 14 टक्के निरक्षरता आहे.
3) आदिवासीतील 60 टक्के लोक शेती व शेतमजूरी या व्यवसायात गुंतले आहेत.
4) आदिवासींची शेती केवळ उदरनिर्वाहक शेती आहे.
5) आदिवासींमध्ये पशूपालन अल्प प्रमाणात आहे.
6) केवळ शिकार करणे एकाही आदिवासीचा व्यवसाय राहिला नाही.
7) आदिवासी लोकांपैकी 51 टक्के लोक अर्धबेकार आहेत.
8) फारच कमी आदिवासींकडे भौतिक आधुनिक साधने आहेत.
9)आदिवासी साक्षर होत आहेत तरीही त्यांचे बहुतांशी शिक्षण 4 थी ते 12 वीच्या आतच बंद होते. पदवी, उच्च पदवी व तंत्रशिक्षण यांचे प्रमाण नगण्य आहे.

*संदर्भ –*

1) भारतीय आदिवासी – डॉ.गुरूनाथ नाडगौंडे, पृ. 3 कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती 2003
2) तत्रैव पृ. 1
3) महाराष्ट्रातील आदिवासी – डॉ. शौनक कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स पुणे पृ. 27
4) भारतीय आदिवासी – तत्रैव पृ. 258

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net